FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (**जिल्हा**):** सिंधुदुर्ग **P.S.(**ठाणे**):** कणकवली
FIR No.(प्रथम खबर क्र.**):** 0028 **Year (**वर्ष**):** 2025
Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ**):**14/02/2025 01:40

2.

S.No. (अ.क्र.)	Acts (अधिनियम)	Sections (कलम)
1	भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023	125(a)
2	भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023	125(b)
3	भारतीय न्याय संहिता (बी एन एस), 2023	281
4	मोटरवाहन अधिनियम, १९८८	184
5	मोटरवाहन अधिनियम, १९८८	185

3. **(a) Occurrence of offence (**गुन्ह्याची घटना**):**
1. **Day(**दिवस**):** गुरूवार **Date From (**दिनांक पासून**):** 13/02/2025
Time Period (कालावधी**):** पहर 7 **Date To (** दिनांक पर्यंत**):** 13/02/2025
Time From (वेळेपासून**):** 19:30 बजे
Time To (वेळेपर्यंत**):** 19:30 बजे

(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे**):**
Date (दिनांक **):** 13/02/2025 **Time (**वेळ**):** 23:00 बजे

(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ **):**
Entry No. (नोंद क्र.**):** 003
Date & Time (दिनांक आणि वेळ**):** 14/02/2025 01:10 बजे

4. **Type of Information (**माहितीचा प्रकार**):** लेखी
5. **Place of Occurrence (**घटनास्थळ**):**
1.**(a) Direction and distance from P.S.(**पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर**):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (**बिट क्र.**):**
(b) Address (पत्ता**):** वागदे गडनदी ब्रीजवर,कणकवली

(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास**):**
Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव**):**
District(State) (जिल्हा**(**राज्य**)):**

6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा**):**

(a) Name (नाव**):** रोहन मिलींद जाधव

(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव**) :**

(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष**):** 1994

(d) Nationality (राष्ट्रीयत्व**):** भारत

(e) UID No. (यु.आय.डी. क्र.**):**

(f) Passport No.(पारपत्र क्र.**):**

Date of Issue (दिल्याची तारीख**):**

Place of Issue (दिल्याचे ठिकाण**):**

(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण **(**राशन कार्ड **,**मतदाता कार्ड **,**पासपोर्ट**,** यूआईडी सं**.,** ड्राइविंग लाइसेंस**,** पॅन कार्ड **)**

S.No. (अ.क्र.)	ID Type (ओळखपत्राचा प्रकार)	ID Number (ओळखपत्राचा क्रमांक)
1		

(h) Address (पत्ता**):**

S.No. (अ.क्र.)	Address Type (पत्याचा प्रकार)	Address (पत्ता)
1	वर्तमान पता	बौद्धवाडी,हळवल,कणकवली,कणकवली,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत
2	स्थायी पता	बौद्धवाडी,हळवल,कणकवली,कणकवली,सिंधुदुर्ग,महाराष्ट्र,भारत

(i) Occupation (व्यवसाय**):**

(j) Phone number (फोन नं**.):**

Mobile (मोबाइल नं**.):** 91-9373613279

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता**):**

S.No. (अ.क्र.)	Name (नाव)	Alias (उर्फनाव)	Relative's Name (नातेवाईकाचे नाव)	Present Address (वर्तमान पता)
1	इकबाल अब्दुल बेग			1. चंदगड,चंदगड,चंदगड,कोल्हापुर, महाराष्ट्र,भारत

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा**-**याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे**):**

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील**):**

S.No. (अ.क्र.)	Property Category (मालमत्ता वर्ग)	Property Type (मालमत्ता प्रकार)	Description (वर्णन)	Value(In Rs/-) (मुल्य (रू.

10 Total value of property (In Rs/-)
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य **(**रू**.** मध्ये**)):**

11.Inquest Report / U.D. case No., if any
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र**.,**जर असल्यास**)):**

S.No. **(**अ.क्र**.)**	**UIDB Number** **(**यु.आय.डी.बी.क्र**.)**

12.First Information contents (प्रथम खबर हकीकत **):**
जबाब

दिनांक 14/02/2025

मी रोहन मिलींद जाधव, वय 31 वर्षे, शिक्षण - 12 वी, व्यवसाय - नोकरी, जात - नवबौध्द, रा. हळवल बौध्दवाडी, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग मोबा. नं.9373613279 समक्ष कणकवली पोलीस ठाणे येथे हजर राहुन तक्रारी जबाब लिहुन देतो की,

माझे राहते घर वरील नमुद पत्यावर असुन त्या ठिकाणी मी, माझे वडील श्री. मिलींद अर्जुन जाधव, आई सौ. मिनल, बहीण सोनाली जाधव, भाचा दक्ष जाधव असे एकत्रित राहतो. माझी बहीण सोनाली हिचा घटस्फोट झालेला असुन घटस्फोट झालेपासुन ती व तिचा मुलगा दक्ष हे हळवल येथे आमचे घरी राहतात. माझा भाचा दक्ष हा इयत्ता 4 थी वर्गामध्ये जि.प.पुर्ण प्राथमिक शाळा नं.1 हळवल या शाळेत शिक्षण घेत आहे. भाचा दक्ष हा जानवली येथील खाजगी क्लासेस मध्ये शिक्षण घेण्यासाठी जातो. त्याला सोडण्यासाठी माझी बहीण सोनाली ही दररोज सायंकाळी 05:00 वा. चे सुमारास स्कुटी गाडी नं.MH03 CJ 8043 या गाडीने घेवुन जाते, व सायंकाळी 07:00 वा. चे सुमारास त्यास घरी स्कुटी गाडीने घेवुन येते. मी शिरागाव येथील कर्ले कॉलेज मध्ये शिपाई म्हणुन सन 2018 पासुन काम करीत आहे.

दिनांक 13/02/2025 रोजी रात्री 08:00 वा. चे सुमारास मी शिरगाव येथुन घरी येत असताना मला माझ्या आईने फोन करुन बहीण सोनाली व भाचा दक्ष यांचा वागदे गडनदी येथील ब्रिजवर मुंबई ते गोवा महामार्गावर एका ट्रकने स्कुटी गाडीला धडक देवुन अपघात केलेला आहे. त्या अपघातात ते दोघेही जखमी असुन त्यांना डॉ. नागवेकर हॉस्पीटल कणकवली येथे उपचारासाठी ॲडमिट केले आहे, तु लवकर ये असे सांगितले. त्यामुळे मी लगेच डॉ. नागवेकर हॉस्पीटल कणकवली येथे आलो. तेथे बहीण सोनाली व भाचा दक्ष याला पाहीले असता भाचा दक्ष याचे पोटाजवळ किरकोळ व गंभीर दुखापत झालेली दिसली. तसेच बहीण सोनाली हिचे डोक्याचे पाठीमागील बाजुस, डाव्या पायाला टाचेजवळ वगैरे अनेक ठिकाणी किरकोळ व गंभीर दुखापत झालेल्या दिसल्या. त्यानंतर तेथे उपस्थित असलेले काही लोकांपैकी बाबल घाटकर रा. वेंगुर्ला यांचेकडुन समजले की, माझी बहीण सोनाली ही तिची स्कुटी गाडी नं.MH03 CJ 8043 ही चालवित व तिचे पाठीमागे भाचा दक्ष बसुन कणकवली ते हळवल फाटा दिशेने मुंबई ते गोवा महामार्गावरुन डाव्या बाजुने वागदे गडनदी येथील ब्रिजवर मुंबई ते गोवा महामार्गावर रात्री 07:30 वा. चे सुमारास जात असताना स्कुटी गाडीला भरधाव वेगाने गोवा दिशेला जाणाऱ्या ट्रक नं.KA22 C 0882 ने पाठीमागुन धडक देवुन अपघात केला, त्यावेळी मोठा आवाज आला. तेंव्हा त्या ट्रकखाली स्कुटी गाडी अडकलेली असताना ट्रक ड्रायव्हरने ट्रक तसाच स्कुटीसहीत फरफडत पुढे नेवुन थांबवला. अपघात ठिकाणी बहीण सोनाली व भाचा दक्ष हे गंभीर जखमी होवुन पडले होते. त्यांना औषध उपचाराकरीता त्यांचे खाजगी गाडीने हॉस्पीटल मध्ये आणुन ॲडमिट केले असे समजले. तसेच अपघात करणाऱ्या ट्रक नं.KA22 C 0882 वरील चालकाचे नाव इकबाल अब्दुल बेग, वय अंदाजे 55 वर्षे, रा. चंदगड, ता. चंदगड जि. कोल्हापूर असे असल्याचे व तो ट्रक चालविताना दारुच्या नशेत असल्याचे त्यांचेकडुन समजले.

दिनांक 13/02/2025 रोजी रात्री 07:30 वा. चे सुमारास वागदे गडनदी येथील ब्रिजवर मुंबई ते गोवा महामार्गावर ट्रक नं.KA22 C 0882 वरील चालक इकबाल अब्दुल बेग, वय अंदाजे 55 वर्षे, रा. चंदगड, ता. चंदगड जि. कोल्हापूर याने त्याच्या ताब्यातील ट्रक दारुच्या नशेत रस्त्याचे परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन भरधाव वेगात चालवुन माझी बहीण सोनाली जाधव हिचे स्कुटी गाडी नं.MH03 CJ 8043 ला पाठीमागील बाजुने धडक देवुन अपघात केला. व त्यात बहीण सोनाली जाधव व भाचा दक्ष जाधव यांचे किरकोळ व गंभीर दुखापतीस कारणीभुत झाला, म्हणुन माझी चालक इकबाल अब्दुल बेग याचेविरुध्द तक्रार आहे.

13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र**.**२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे**.)**

(1) Registered the case and took up the investigation:
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

or (किंवा**)**

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका**-**याचे नाव**):**
mahesh shivaji shedge
Rank (पद**):** पोलीस निरीक्षक **No.(**क्र**.):**
to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) Transferred to P.S.
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

District (जिल्हा**):**
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली**.)**

R.O.A.C.(आर**.** ओ **.**ए **.**सी**.)**

14 Signature/Thumb impression of the complainant / informant.
(तक्रारदाराची/खबर देणा**-**याची सही/अंगठा**):**

15. Date and time of dispatch to the court
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

Signature of Officer in charge, Police Station
(ठाणे प्रभारी अधिका**-**याची स्वाक्षरी**)**

Name (नाव**):** Maruti Dnyandev Jag
Rank(पद**):** I (Inspector)
No.(सं**.):**

Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र**.** ७ ला जोडपत्र**): Physical features, deformities and other details of the (If known / seen)(**संशयीत/आरोपीचे **(**माहित असलेल्या/पाहिलेल्या**)** शारीरिक वैशिष्ट्ये**,** व्यंग आणि इतर तपशील**))**

S.No.(अ.क्र.**)**	**Sex (**लिंग**)**	**Date/Year of Birth (**जन्म तारीक/ वर्ष**)**	**Build (**बांधा**)**	**Height (cms.) (**उंची**(**सें. मी.**))**	**Complexion (**रंग**)**	**Identification Mark (s) (**ओळखीच्या खुणा**)**
1	**2**	**3**	**4**	**5**	**6**	**7**
1	पुरुष					चेचक के दाग: YES

Deformities/ Peculiarities	**Teeth (**दात**)**	**Hair (**केस**)**	**Eyes (**डोळे**)**	**Habit(s) (**सवयी**)**	**Dress Habit(s) (**पोषाखाच्या सवयी**)**
8	**9**	**10**	**11**	**12**	**13**

Language /Dialect (भाषा / बोलीभाषा**)**	**Place Of (**का स्थान**)**					**Others (**इतर**)**
	Burn Mark (भाजल्याच्या खुणा**)**	**Leucoderma (**कोड**)**	**Mole (**तिळ**)**	**Scar (**व्रण**)**	**Tattoo (**गोदण**)**	
14	**15**	**16**	**17**	**18**	**19**	**20**

These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.
(जर तक्रारदार/माहिती देणा**-**याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल**.)**

शामुको.-चाय २६-२०,०००-अे ४'-७.२०१२

Form : II

CRIME DETAILS FORM

घटनास्थळ पंचनामा/गुन्ह्याच्या तपशिलाचा नमुना

1. State महाराष्ट्र Dist सिंधुदुर्ग P.S. कणकवली FIR/~~Proceeding~~/G.D. No. 26 Year 2025 Date 19/02/2025
   राज्य जिल्हा पोलीस ठाणे पहिली खबर क्र./कार्यवाही क्र. वर्ष तारीख

2. Act and Section :
   अधिनियम व कलमे :

3. The Place of Occurrence shown by :
   घटनेचे ठिकाण दाखवण्याऱ्याचे :

   Name : विनायक शेकर गावकर Father's/Husband's Name : शेकर गावकर
   नाव पित्याचे/पतीचे नाव :

   Address : वा. वागदे, आवरकरवाडी, ता. कणकवली, मो.नं - 9422379438
   पत्ता :

4. Type of Crime (All including M. O. Crime) :
   गुन्ह्याचा प्रकार (गुन्ह्याच्या सर्व पध्दतीसह) :

   (i) Major Head : मोटार अपघात (ii) Classification of Major Head :
   प्रधान शीर्ष : प्रधान शीर्षाचे वर्गीकरण :

   (iii) Method (s) :
   पध्दती :

   1 दारुच्ये नशेत भरधाव वेगात वाहन चालवून समोरील गाडीस
   2 ठोकून अपघात करणे.
   3

   (iv) Conveyances used : KA 22 C 0882 या नंबरच्या अशोक लेलँड कंपनीचा ट्रक
   वापरलेली वाहने :

   (v) Character assumed :
   केलेले वेषांतर केलेली बतावणी : —

   (vi) Language/s. lang. used :
   वापरलेली भाषा / बोली भाषा : —

   (vii) Special Feature-1:
   विशेष वैशिष्ट्ये-१ : —

   Special Feature-2:
   विशेष वैशिष्ट्ये-२ : —

   Special Feature-3:
   विशेष वैशिष्ट्ये-३ : —

   (viii) Type of place of Occurrence- वागदे, गडनदी ब्रीज, कणकवली
   घटनेच्या ठिकाणाचा प्रकार :

   (viii) Type of Property Involved (4 Types) (major head of the Property to be filled)
   अंतर्भूत मालमत्तेचे प्रकार :

   (1) — (2)

   (3) (4)

5. Particulars of the Victims (Attach separate sheet, if required) :
बळींचा तपशील (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) :

Sr. No. अ. क्र 1	Full Name संपूर्ण नाव 2	Date / Year of Birth जन्मतारीख/ वर्ष 3	Sex लिंग 4	Nationality राष्ट्रीयत्व 5	Religion धर्म 6	Whether SC/ST जाती/ जमाती 7	Occupation व्यवसाय 8	Address पत्ता 9	Injury Grievous/ Simple दुखापत गंभीर/साधी 10	Means साधने/ हत्यारे 11
1)	सोनाली मिलींद जाधव	29	स्त्री	भारतीय	-	-	-	रा. हव्यवत ता. कळकवली	गंभीर	-
2)	पद्म मिलींद जाधव	10	पु	भारतीय	-	-	-	रा. हव्यवत ता. कळकवली	गंभीर	-

6. Motive of Crime : दारुच्या नशेत भरधाव वेगात वाहन चालवून अपघातास कारणीभूत.
गुन्ह्याचा हेतू :

7. Details of Properties Stolen/Involved : [Use appropriate prescribed forms (s) and attach] :
चोरीच्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (योग्य नमुना वापरावा व सोबत जोडावा) :

निरंक

8. Description of the place of occurrence :
घटनेच्या जागेचे वर्णन :

आज दिनांक 18/02/2025 रोजी आम्हांना कळकवली पोलीस ठाण्यात नेमणुकीस असणारे पोना/1197 गुरव यांनी आम्हांना सांगितले की, वागदे गडनदी, ब्रीज व रकुटी यांचेत अपघात झालेला आहे. त्याबाबत डायल 112 च्या mov वर कॉल आला असून तुम्ही वागदे गडनदी, ब्रीज, कळकवली येथे जावा व अपघातग्रस्त व्यक्तिंना मदत करा व पोनि/हुमाप्र, पोहेकॉ/829 पांढरे, सपोफौ/868 सावंत असे रेशन डायरी नोंद नं 26 अशी. त्याप्रमाणे नोंद करुन सरकारी वाहनाने 20:00 वाजता, वागदे गडनदी, ब्रीज कळकवली

Description of the place of occurrence (Contd.) :
- घटनेच्या जागेचे वर्णन (पुढे चालू) :

येथे रवाना झाली. तसेच आम्ही कॉलम ने 12 महीला नमुद नामे पंचाना वागदे, गडनदी, ब्रीज, कणकवली येथे बोलावून घेतले. त्यांना थोडक्यात हकीगत सांगुन मदत अपघातांच्या ठिकाणी परिस्थितीप्रमाणे पंचनामा करावयाचा असल्याने त्यांना पंच म्हणून हजर रहा अशी विनंती केली असता त्यांनी संमती दर्शविल्यानंतर घटनास्थळी उपस्थित प्रत्यक्षदर्शी साक्षीदार विलास शेकु गावकर, वय -62 वर्षे, रा. वागदे, सावरकरवाडी, ता. कणकवली यांची आम्ही पंचानी ओळख करून घेवून ते अपघाताचे घटनास्थळ पाहणार आहेत असे सांगितले. त्यांच्या समक्ष अपघाताच्या घटनास्थळाचा ठिकाणच्या परिस्थितीचा पंचनामा केला तो खालील प्रमाणे

आम्ही आमची पोलीस, पंच व प्रत्यक्षदर्शी साक्षीदार "विलास शेकु गावकर असे घटनास्थळी हजर असुन प्रत्यक्षदर्शी साक्षीदार विलास शेकु गावकर यांनी आम्हाला पंचासमक्ष सांगितले की, "आज दिनांक 13/02/2022 रोजी मी कामानिमित्त माझ्या मोटारसायकलने वागदे येथुन कणकवली येथे जात असताना साधारणे 07:30 वाजताचे सुमारास वागदे गडनदी ब्रीज, कणकवली येथे मुंबई ते गोवा महामार्गावर रस्त्याच्या कडेला झालेला अपघात मी पाहीले. म्हणुन मी अपघाताच्या ठिकाणी पोहचलो असता काहीलोक तेथील एका महीलेला व एका मुलाला खाजगी वाहनाने हॉस्पीटलला नेत होते. त्यानंतर तेथील लोकांकडुन मला त्यांचीनावे सोनाली सिताराम जाधव व [redacted] जाधव असे असल्याचे समजले. तसेच दुसऱ्या पुढील [redacted] दुकान स्कुटी अडकलेली होती. ट्रक चालक ट्रक न थांबवता ती स्कुटी फरफटत नेत असताना त्या दुकली काहीलोकांनी, हळवल फाट्यावर थांबवले. त्यामुळे मी चालत त्या ट्रकपाशी पोहचलो असता तेथे एक चालक हा त्याच्या नरीन असल्याचे मला दिसले. त्यावेळी आम्ही त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव इकबाल अब्दुल बेग असल्याचे त्याचेकडुन मला समजले. तेथे थोड्याच वेळात पोलीस आले" असे सांगुन साक्षीदार विलास